
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५८ वे, अंक ३रा, मुंबई । मे २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 3, Mumbai I May 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

# जयहिंद





देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५८वे, अंक ३रा,
मे २०२५
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





**वसंत उत्सव, मुलुंड**



**सामुदायिक व्रतबंध सोहळा – बेळगांव**




**सामुदायिक व्रतबंध सोहळा – नाशिक**


क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days
Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb
Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days
Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days
Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

Ravindra Deshpande

REC

RASHMI
ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

# संपादकीय

## दहशतवादयांनी माणुसकीची हत्या केली – पहलगाम हल्ल्यातील मृतांना भावपूर्ण श्रध्दांजली

दि. २२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला २०हून अधिक लोक जखमी झाले आहेत बैसरन खोऱ्यात मोठ्या संख्येने पर्यटक उपस्थित असताना हा भ्याड हल्ला झाला आहे. मृतांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, उडिसातील पर्यटकांचा समावेश आहे. नेपाळ आणि यु ए ई मधील १ पर्यटक आणि २ स्थानिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली!

या हल्ल्यात ५ दहशतवादी सहभागी असल्याचे समोर आले आहे. यापैकी २ स्थानिक आणि ३ पाकिस्तानी दहशतवादी होते. पहलगाममध्ये झालेल्या या दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठक झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्रीय मंत्री एस. जयशंकर, एन. एस. अजित डोभल यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मा. पंतप्रधान मोदीजी या हल्ल्याला चोख उत्तर देतील यात शंका नाही आपण सर्वजण मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या पाठीशी आहोत. निष्पाप पर्यटकांचा जीव घेणाऱ्या दहाशतवाद्यांचा जाहीर निषेध. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली!

ता.क. : 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या सर्व भारतीय जवानांचे हार्दिक अभिनंदन!

**– मिलिंद म. सरदेशमुख**

# समर्थांना अभिप्रेत नामसाधना (भाग-२)

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

समर्थ रामदास स्वामींनी नामसाधनेची पद्धत अत्यंत सोपी आणि सर्वांना साध्य अशी सांगितली आहे. त्यांच्या मते, नामस्मरण हे मनापासून, एकाग्रतेने आणि नियमितपणे करावे. सकाळी आणि सायंकाळी निश्चित वेळी, शांत ठिकाणी बसून, मनात किंवा उच्चाराने नामाचा जप करावा. रामदासी परंपरेत, नामस्मरणाला कोणत्याही कठीण विधींची गरज नाही; फक्त श्रद्धा आणि भक्ती आवश्यक आहे. नाम घेताना शारीरिक शुद्धता आणि मानसिक शांतता यांचा समन्वय असावा, असे समर्थ सांगतात. दासबोधात समर्थांनी नामस्मरणाचे महत्त्व अनेक ठिकाणी सांगितले आहे. नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ।।११।। नामाच्या योगे संकटे नाश पावतात, विध्यांचे निवारण होते आणि नामस्मरणाने माणूस श्रेष्ठ पदास पोहोचतो. (११) 'श्रीराम जय राम जय जय राम' हा मंत्र रामदासी परंपरेत अत्यंत पवित्र आणि प्रभावी मानला जातो. या मंत्रात श्रीरामांचे नाव, त्यांचा जयघोष आणि भक्तीचा उत्साह दडलेला आहे. समर्थांनी या मंत्राला 'तारक मंत्र' म्हटले आहे, कारण तो भवसागरातून तारणारा आहे. रामदासी पद्धतीत या मंत्राचे नियमित स्मरण केल्याने मन शुद्ध होते आणि प्रभु रामचंद्रांशी एकरूपता साधली जाते. या मंत्राचा जप आत्मिक शांती आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नामस्मरणाने मन शांत, स्थिर आणि सकारात्मक बनते. समर्थ सांगतात की, सतत नामस्मरणाने मनातील नकारात्मक विचार, चिंता आणि भय नष्ट होतात. मनाला एकाग्रता प्राप्त होते आणि आत्मविश्वास वाढतो. नामाचा सतत जप केल्याने मन ईश्वराशी जोडले जाते, ज्यामुळे व्यक्तीला

मानसिक शांती आणि समाधान मिळते. नामस्मरणामुळे विचारांवर सात्त्विक परिणाम होतो. व्यक्तीचे विचार पवित्र, उदात्त आणि परमार्थाकडे झुकतात. समर्थांच्या मते, नामामुळे अहंकार, लोभ, क्रोध यांसारखे दोष कमी होतात आणि विचारांमध्ये स्पष्टता येते. सतत नामस्मरणाने मनातील विकारांचा प्रभाव कमी होऊन विचार सृजनशील आणि सकारात्मक बनतात. समर्थ रामदास स्वामींनी उपास्य दैवत किंवा कुलदैवताच्या नामाला विशेष महत्त्व दिले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कुलदैवताशी भावनिक नाते असते. त्यामुळे त्या दैवताच्या नामाचा जप केल्याने भक्ती अधिक दृढ होते. श्रीराम, हनुमान, गणपती किंवा अन्य दैवतांचे नाम घेताना भक्ताला त्यांच्या दैवी शक्तीचा आधार वाटतो, ज्यामुळे आध्यात्मिक प्रगती सुलभ होते. एकाच नामाचा सतत जप केल्याने भक्ताची त्या नामाशी एकरूपता निर्माण होते. समर्थांच्या मते, एकच नाम सतत घेतल्याने मन एकाग्र होऊन ईश्वराशी संनाद साधला जातो. यामुळे भक्ताला आत्मसाक्षात्काराची अनुभूती मिळते आणि तो आध्यात्मिक साधनेत पुढे जातो. ही एकरूपता भक्ताला मोक्षाच्या मार्गावर नेऊ शकते.कोणत्या देवाचे नाम घ्यावे असा अनेकांना प्रश्न पडत असतो व त्यात अनेक शंका कुशंका असतात. या सर्व शंकांचे उत्तर पुढील ओवीमधे सापडते. समर्थ म्हणतात – परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां, येमें– । बाधिजेना ।।१९।। परमेश्वराची अनंत नामे आहेत. त्यातील एखाद्या नामाचे नित्यनेमाने प्रेमाने स्मरण केले असता माणूस उद्धरून जातो. नामस्मरणाच्या प्रभावाने यमयातना भोगाव्या लागत नाहीत. (१९) समर्थांच्या या शिकवणीवरून नामसाधना ही केवळ भक्तीच नव्हे, तर जीवनाला अर्थ देणारी शक्ती आहे. नामस्मरणाने मन, विचार आणि आत्मा शुद्ध होऊन भक्ताला परमार्थाचा मार्ग सापडतो. ही साधना सतत केल्यास जीवन समृद्ध आणि परिपूर्ण बनते.

## शारीरिक तपासणी

**डॉ. नीरज रायते (मो. : ९९२२४२७०६७)**

आपल्या आजाराचा वेध घेताना लक्षणांचा आणि मूलभूत माहितीचा अभ्यास झाल्यावर डॉक्टर रोगनिदानासाठी शारीरिक तपासणीकडे वळतात. याला आम्ही 'क्लिनिकल एक्झॅमिनेशन' म्हणतो : ही एक अत्यंत महत्त्वाची पायरी असून, केवळ लक्षणांच्या आधारे रोगनिदान करणे धोक्याचे असते. अनेक रुग्ण डॉक्टरांना फोनवरुनच सल्ला मागतात आणि प्रत्यक्ष शारीरिक तपासणी टाळतात. एकच लक्षण अनेक आजारांशी संबंधित असू शकते. प्रत्यक्ष तपासणीत आढळणाऱ्या चिन्हांच्या आधारे रोगनिदानास पुष्टी मिळते. म्हणून प्रत्यक्ष डॉक्टरला भेटणे महत्त्वाचे असते. शेवटी आपण उपचार माणसांच्या तक्रारींचे करतो रिपोर्ट्सचे नाही. डॉक्टरांना भेटल्याने रुग्णाची शारीरिक स्थिती आणि त्यामध्ये झालेले बदल जाणून घेणे रोगनिदान करण्यासाठी अत्यंत उपयोगी पडते. केवळ नाडीपरीक्षा किंवा लक्षणांचा अभ्यास करून रोगनिदान करण्याचे दिवस आता संपले आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. या मूलभूत परीक्षादेखील परिपूर्ण आहेत असे नव्हे. नव्या वैज्ञानिक युगात रुग्णाला आजाराचा पुरावा हवा असतो. केवळ कावीळ आहे असे म्हणून चालत नाही. त्या कावीळीचे कारण, स्वरुप, गांभीर्य यासाठी प्रयोगशालेय तपासणी करणे गरजेचे असते. संपूर्ण शरीराची शारीरिक तपासणीदेखील नियोजनबद्ध हवी. सर्वप्रथम सर्वसाधारण निरीक्षण आणि मग विविध आणि विशिष्ट अवयव संस्थांची तपासणी करुन क्रमवारे संपूर्ण शरीराचा वेध घेतला जातो. दररोजच्या नित्य नैमित्तिक किरकोळ आजारांमध्ये अशी कंटाळवाणी परिपूर्ण तपासणी करण्याची आवश्यकता नसते आणि कुशल, अनुभवी, तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध वेळात सारासार विचार करुन आवश्यक

तेवढी माहिती गोळा करतातच. आजकाल डॉक्टराविषयीसविस्तर माहिती इंटनेटवर उपलब्ध असते परंतु प्रत्यक्ष भेटल्याने हे नाते अजून दृढ होते. विशेषतः सर्जरीच्या क्षेत्रामध्ये आपल्यावर ऑपरेशन करणाऱ्या व्यक्तीचे वय काय आहे, त्याचा अनुभव काय आहे तो रुग्णाविषयी किती काळजी करतो हे मुद्दे आपल्या एहिक सोयी सोयी सुविधाइतकेच महत्त्वाचे असतात .ह्या गोष्टींची काळजी एन घेतल्यास अपेक्षित रिझल्ट्स एन मिळण्याची शक्यता असते. अलीकडे उपलब्ध झालेल्या आधुनिक निदान सुविधांमुळे ही पारंपरिक निदानपद्धती कमी महत्त्वाची वाटतेय! डॉक्टर–रुग्ण संबंधातील हा महत्त्वाचा दुवा आता दुर्लक्षित होतोय. पण ग्रामीण भागात, अविकसित, दुर्गम भागात आजही या पारंपारिक चिकित्सा पद्धतीला महत्त्व आहेच. कमी खर्चाची, सहज साध्य शारीरिक तपासणी अजूनही मोलाचीच आहे. तिला शास्त्रीय, विज्ञाननिष्ठ बैठक मात्र असायला हवी. विशिष्ठ निदान का केले? उपचार कसा केला? याविषयी रुग्णाच्या चिकित्सक प्रश्नांना समाधानकारक उत्तर देणे डॉक्टरांचे कामच आहे. एवढेच नव्हे, तर प्रत्येक रुग्णाचे त्याच्या आजाराविषयी प्रबोधन करणे हे पण अपेक्षित आहे. प्राथमिक तपासणीत रुग्णाच्या आरोग्यासंबंधी मूलभूत नोंदी ठेवल्या पाहिजेत. रुग्णाची अवस्था, नाडीची गती, नियमितता, तापाची नोंद, श्वासोच्छ्श्वासाची गती, रक्तदाब, पायावरील सूज, सांध्याची परीक्षा, निमिया, कावीळ, लसीग्रंथींची वाढ, एखादे जन्मजात व्यंग, नाक, कान, घशाची तपासणी, जीभेची तपासणी, एखादी गाठ आहे काय, दातांची आणि नखांची स्वच्छता, अंगावरील पुरळ, वजन, उंची, जलशोष, थायरॉईड ग्रंथीची वाढ अशा एक ना अनेक गोष्टी सरावाने पाहिल्या जातात आणि आवश्यक नोंदी केल्या जातात. अशा नोंदी पुढील प्रत्येक भेटीत फार उपयोगी पडतात. रुग्णाच्या प्रगतीविषयी त्यामुळे माहिती होत असते. केवळ नाडी परीक्षा किंवा लक्षणांचा अभ्यास करून रोगनिदान आणि उपचार करण्याचे दिवस आता संपले आहेत. शारीरिक तपासणी व प्रयोगशालेय चाचण्या करून विज्ञाननिष्ठ उपचार करणे आता आवश्यक आहे.


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*

*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

# मराठी माणसाचं पुलदैवत पु. ल. देशपांडे

**प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर**

नाट्य लेखन, एकांकिका लेखन, विनोदी लेखन, गद्यविडंबन, वेचक व्यक्तिचित्रण, प्रवासवर्णन, अभिनय, दिग्दर्शन, व्याख्यानं, गायन, वादन, संगीत अशा अनेक क्षेत्रात आपली कालातीत मुद्रा उमटविलेले, मराठी मनाला हयातभर आनंद दिलेले, 'पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे' हे मराठी माणसांचं पुलदैवत आणि महाराष्ट्राचं एक लाडकं व्यक्तिमत्त्व होतं. पु.ल.देशपांडे यांचा जन्म १९१९ सालातल्या ८ नोव्हेंबरला मुंबईतल्या कृपाळ हेमराज चाळीत झाला. त्यांचं शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत आणि पुण्यात झालं. त्यांनी बी.ए.एम.ए., एलएल.बी., या पदव्या संपादन केल्या होत्या. किशोर वयातच पु.लं.नी लेखनास सुरूवात केली. पंधराव्या वर्षी त्यांनी संगीत सिंहगड नाटक लिहिलं आणि त्यात भूमिकाही केली. १४ व्या वर्षी पेटीवादनाचा पहिला जाहीर कार्यक्रम केला. काही वर्षे शाळेत शिक्षक, तसेच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून त्यांनी नोकरी केली. १९५५ मध्ये पुणे आकाशवाणी केंद्रावर, त्यानंतर मुंबई नभोवाणी केंद्रावर निर्माता पदावर काम केलं. नोकरीत असताना शिष्यवृत्ती मिळवून बी.बी.सी. तर्फे दूरदर्शन प्रशिक्षणासाठी इंग्लंडला गेले. निर्माता या पदावर काम करत असताना त्यांनी नभोवाणी शेतकरी मंडळ, बया दार उघड, अमृतवृक्ष, जनाबाई असे अनेक दर्जेदार कार्यक्रम सादर केले. १९५९ साली दूरदर्शनवर भारतातील पहिला कार्यक्रम सादर करण्याचा मान त्यांना मिळाला.

'तुका म्हणे आता', 'तुझे आहे तुजपाशी' ही दोन नाटकं स्वतंत्र म्हणून त्यांच्या खाती जमा आहेत. 'तीन पैशाचा तमाशा', 'एक झुंज वाऱ्याशी', 'झुंज', 'अंमलदार', 'ती फुलराणी' अशी त्यांची रूपांतरित नाटकं आहेत. विठ्ठल तो आला आला, सारं कसं शांत शांत, छोटे मासे मोठे मासे, सदू आणि दादू, सांत्वन इत्यादी एकांकिका त्यांनी लिहिल्या, लोकप्रियही झाल्या. ती फुलराणीचे तर हजारो प्रयोग झाले. त्यामुळं ते नाटयरसिकांच्या गळयातील ताईतच झाले. ''त्यांनी नाट्य लेखनाबरोबरच वहिनी, माझं घर कुलवधू, भावबंधन, सुंदर मी होणार,अंमलदार या नाटकात तसेच तुझं माझं जमेना, फरारी, सतरावे वर्ष या एकांकिकात नट म्हणून काम केलेलं होतं. याशिवाय कुबेर, भाग्यरेषा, पुढचं पाऊल, अंमलदार, देवबाप्पा, गुळाचा गणपती या चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या.'' गुळाचा गणपतीमध्ये तर 'सबकुछ पु.ल!' या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन, संगीत त्यांचचं होतं. या चित्रपटातून त्यांच्या अष्टपैलू गुणांचं दर्शन घडतं. देवबाप्पा चित्रपटातील 'नाच रे मोरा आंब्याच्या बनात' हे गीत आजही रसिकप्रिय आहे.

आजही त्यांनी लिहिलेल्या एकांकिका शाळा, महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनात सादर केल्या जातात. नाटयलेखन, अभिनय या क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळं १९६५ साली नांदेडमध्ये झालेल्या नाटयसंमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.

पु.लं. हे कोट्या करण्यातही तरबेज होते. अभिनेत्री दुर्गाबाई खोटे यांच्याबद्दल बोलताना पु.ल. म्हणाले होते ''दुर्गाबाईंचं आडनांव सोडलं तर त्यांच्यात काहीच खोटं नाही, सारचं अस्सल.'' सवाई गंधर्वांचे शिष्य असलेले गायक पंडित भीमसेन जोशी कार्यक्रमानिमित्त विमानानं खूप फिरायचे म्हणून पु.लं. भीमसेन जोशींबद्दल म्हणाले होते, 'गुरू सवाई गंधर्व तर शिष्य हवाई गंधर्व आहे.'

पु.लं.ची 'खोगीरभरती', 'नसती उठाठेव', 'बटाट्याची चाळ', 'गोळीबेरीज', 'हसवणूक' इत्यादी विनोदानं

गच्च भरलेली पुस्तकं वाचकांची निखळ करमणूक करतात, त्यांना हसवतात. त्यांच्या विनोदात उत्स्फूर्तता, संयम आणि सहृदयता आहे. 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत', 'मैत्र', 'गुण गाईन आवडी' या पुस्तकात त्यांनी आपल्याभोवती असणाऱ्या माणसांच्या गुणदोषांचं, स्वभाव वैशिष्ट्यांचं चित्रण काल्पनिक पात्रं निर्माण करून अगदी चपखल शब्दात रेखाटलं आहे. त्यांच्या व्यक्तीचित्रातील व्यक्तींची नावं आज मराठी भाषेत सर्वानामासारखी वापरली जातात. लग्न समारंभात आपुलकीनं झटणारा माणूस आपल्याला 'नारायण' वाटतो. 'पूर्वरंग', 'अपूर्वाई', 'जावे त्यांच्या देशा' अशा काही पु.लं.च्या प्रवासवर्णनपर पुस्तकातून त्यांच्यातील सूक्ष्म निरिक्षकाची आणि समाजभाष्यकारांची कल्पना येते.

आपल्या विनोदी शैलीतून ते वाचकांना जगाचं दर्शन घडवतात. त्यांच्या वैविध्यपूर्ण वाङ्मयीन कर्तृत्वामुळं त्यांची १९७४ साली इचलकरंजी इथं भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली.

लिखाणातून, एकपात्री प्रयोग करून मिळालेल्या पैशाचा विनियोग चांगल्याप्रकारे समाजकार्यासाठी व्हावा म्हणून पु.लं.नी 'पी.एल.फाऊंडेशन' हा ट्रस्ट स्थापन केला. या फाऊंडेशनच्यावतीनं मुक्तागंण व्यसनमुक्ती केंद्र, मुंबईतील रक्तपेढी, देवरूखच्या आठल्ये-सप्रे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास तसेच गरजू पण समाजोपयोगी काम करणाऱ्या काही संस्थांना रोख स्वरूपात, वस्तुरूपात मदत केली गेली.

ते नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्चे (एन.सी.पी.ए.) 'मानद संचालक' होते. त्यांना साहित्यिक कर्तृत्वातबद्दल महाराष्ट्र शासनाकडून अनेक पुरस्कार मिळाले. या व्यतिरिक्त त्यांना महाराष्ट्र भूषण, पद्मश्री, पद्मविभूषण पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेलं होतं. आपल्या अंगभूत गुणांच्या बळावर लोकविलक्षण झालेलं, पु.लं. नावाचं लाडकं, हरहुन्नरी व्यक्तिमत्व १२ जून २००० रोजी कायमचं काळाच्या पडद्याआड गेलं.




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201

Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

THE NEW INDIA ASSURANCE CO. LTD.

STAR Health Insurance Personal & Caring

The Health Insurance *Specialist*

*Get Insured... & Be Secured....*

# संलग्न संस्था वृत्त

* **बेळगाव :** बेळगावातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाने गेल्या अनेक वर्षापासून सामुदायिक उपनयनाचा उपक्रम चालू ठेवला आहे. हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, असे विचार अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबईचे अध्यक्ष महेंद्र (भैय्या) मोहिनीराज गंधे यांनी बोलताना व्यक्त केले. सोमवारी चिदंबरनगरातील चिदंबर देवस्थानात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्यावतीने आणि समर्थ अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या सामुदायिक उपनयन समारंभास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी 'समर्थ'चे चेअरमन ॲड. अजय सुनाळकर यांनी संस्थेंच्या उपक्रमाचा आढावा घेतला आणि गेल्या २६ वर्षापासून सातत्याने आम्ही हा उपक्रम राबवीत आहोत. यंदा पाच बटूंच्या मुंजी करण्यात आल्या, अशी माहिति त्यांनी सांगितली. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी यापुढेही सहकार्य कारावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दुसरे पाहुणे अखिल जिल्हा ब्राह्मण समाज ट-स्टचे अध्यक्ष उद्योजक राम भंडारे यांनी उद्योग व्यवसायातील ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी आपण बेळगाव जिल्हा ब्राह्मण संघाची स्थापना केली असल्याची माहिती दिली. अशा कार्यक्रमात समाजाचा सहभाग मोठया प्रमाणात व्हायला हवा, असे मत व्यक्त केले. या भागाच्या नगरसेविका आणि उपमहापौर सौ. वाणी विलास जोशी यांचेही शुभेच्छापर भाषण झाले. 'समर्थ'च्या संचालिका सुनंदा आळतेकर यांनी सूत्रसंचालन केले तर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे सचिव श्री. अरुण कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष विजेंद्र जोशी, चेअरमन विनायक जोशी, 'समर्थ'चे व्हाईस चेअरमन अभय गुडी, संचालक गणपत कुलकर्णी, प्रदीपकुमार कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी, मालतेश पाटील, छाया जोशी, अनिल भंडारी, उमेश सुनगार, परशुराम कांबळे, अस्मिता जोशी आदी उपस्थित होते.

* के - सीईटी परीक्षेदरम्यान शिमोगा व बिदर जिल्ह्यांमध्ये ब्राह्मण विद्यार्थ्यांचे जानवे जबरदस्तीने कापून काढून घेण्यात आले. या घटनेविरोधात बेळगाव जिल्हा समस्त ब्राह्मण समाज आक्रमक झाला असून सोमवारी चन्नमा चौक येथे मानवी साखळी करून आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला.

मागील आठवडयात इंजिनिअरिंग तसेच पॅरामेडिकल कोर्सेससाठी के - सीईटी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेवेळी खांद्यावर जानवे घालून गेलेल्या ब्राह्मण विद्यार्थ्यांना बाजूला काढून त्यांचे जानवे कापण्यात आले. हा एक प्रकारचा धार्मिक स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे संतापलेल्या विद्यार्थ्यांना योग्यप्रकारे परीक्षाही दिली नाही. केवळ ब्राह्मण विद्यार्थ्यांनाच लक्ष्य करण्याचा कर्नाटक परीक्षा मंडळाचा प्रयत्न होता का? असा प्रश्न अपस्थित करण्यात आला.

सोमवारी बेळगावमधील समस्त ब्राह्मण समाजाच्यावतीने कन्नड साहित्य भवन येथून मोर्चा काढण्यात आला. राणी चममा चौक येथे साखळी उपोषण करून सरकारविरोधात निदर्शने करण्यात आली. हातामध्ये जानवे घेऊन ब्राह्मण समाजाने आंदोलन केले. ज्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना पुढील प्रवेशात संधी मिळावी, जानवे काढलेल्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी व पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत याची काळजी घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

चन्नमा चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जोरदार घोषणाबाजी करत मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी निवेदन स्वीकारून आपण हे निवेदन राज्य सरकारला पाठवून देऊ, असे आश्वासन ब्राह्मण समाजाला दिले. यावेळी बेळगाव शहर तसेच परिसरातील ब्राह्मण बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

*** मुलुंड :** दिनांक सहा एप्रिलला म्हणजे रविवारी रामनवमीचा उत्सवदेशस्थ ऋग्वेदी संस्था मुलुंड पूर्व या शाखेमध्ये उत्साहात साजरा झाला. साधारणतः ७५ ते ८० जणांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. संस्थेचे अध्यक्ष श्री जहागीरदार, कार्याध्यक्ष श्री आडगावकर, प्रमुख विश्वस्त श्री. वडगबाळकर, विश्वस्त श्री अजित कुळकर्णी, श्री दिगवडेकर, महिला शाखा मुख्य सौ. प्रेरणा क्षीरसागर आणि अनेक कमिटी सदस्यांनी हजेरी लावली. प्रारंभी श्रीरामांचा गजर करण्यात आला. नंतर काहींनी गीते सादर केली. दोन भजने म्हणण्यात आली. नंतर श्रीरामांचा पाळणा म्हटला गेला. नंतर आरती झाली. त्यानंतर सर्व महिलांनी फेर धरला, आणि छान नृत्य केले. नंतर सुंठवड्या चा प्रसाद आणि खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. प्रेक्षकांनी खूपच छान प्रतिक्रिया दिल्या.वेळ कमी पडला असं वाटलं.

* बुधवार दिनांक २३ एप्रिल रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेत महिला शाखेचा 'वसंतोत्सव' साजरा झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत श्रद्धांजली वाहिली. महिला शाखा कार्यवाहीका सौ. आरती कुलकर्णी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. चैत्र महिन्याचे महत्त्व सांगून चैत्र गौरीचे सुंदर वर्णन असलेली एक कविता सादर केली. त्यानंतर महिला शाखा अध्यक्षा डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सौ. युगंधरा वळसंगकर यांनी सौ. संगीता उत्पात यांचा परिचय करून दिला. सौ.संगीता उत्पात यांनी 'माझे जीवन गाणे' हा एकपात्री कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. सर्व प्रेक्षकांना खळखळून हसवले, काही प्रसंगी भावूक केले तर काही प्रसंगी विचार करायला प्रवृत्त केले. परिकथेतील राजकुमारा, सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला, अशी विविध गाणी, इंदिरा संत यांची एक कविता, तसेच सासुबाईंची कविताही सादर केली. कार्यक्रम सर्वांना खूप आवडला. कार्यक्रमानंतर सर्वांनी चटपटीत आंबेडाळ आणि थंडगार पन्हे याचा आस्वाद घेतला. महिला शाखा कार्यकारिणींमध्यील सदस्यांनी कमळावर विराजमान चैत्र गौरीची सुंदर सजावट केली होती. सर्वांच्या एकजुटीने कार्यक्रम अतिशय उत्तम झाला.

*** धुळे :** अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी सातत्याने अग्रेसर असलेल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे महिला मंच तर्फे सालाबादप्रमाणे चैत्र गौर पूजन हळदीकुंकवाचा व स्नेहमिलनाचा कार्यक्रम नवग्रहीतील त्रिविक्रम मंदिर संस्थान च्या रामभाऊ गरुड मंगल कार्यालयात नुकताच महिलांच्या उत्साहात संपन्न झाला. महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ रेणुका ताई पेटारे कार्याध्यक्षा सौ गितांजली कुळकर्णी प्रामुख्याने उपस्थित होत्या. प्रारंभी उपस्थित महिलांनी पहलगाम अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप बांधवाना सामूहिकपणे आदरांजली वाहण्यात आली व त्या नंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले व चैत्र गौरीची आरती करुन नैवेद्य दाखवण्यात आला. महिलांचे सामूहिक खेळ, पारिवारिक परिचय आदी कार्यक्रम संपन्न झाले. समारोप प्रसंगी उपस्थित महिलांना कैरी डाळ, पन्हे वाटप करण्यात आले. सौ संध्या कुलकर्णी, सौ सुषमा पुरोहित, सौ सुचेता रुद्र, सौ वैशाली मेहरुणकर, सौ रेवती पागे, सौ प्रभा कुलकर्णी, सौ स्वराली देशमुख आदींनी सोहळ्याचे संयोजन केले. श्रीमती जयश्री कुलकर्णी, श्रीमती पल्लवी राव, श्रीमती सीमा जवखेडकर, सौ लता डोंगरे, श्रीमती युगंधरा दंडवते, आदी मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

*** सोलापूर** : गेली ५/६ वर्षे सोलापुर शहरात सर्व ब्राह्मण संघटना मिळुन परशुराम जयंती हुतात्मा चौकात साजरी करतात. या वर्षी ही संस्था आपण धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी केली व नेहमी प्रमाणे उत्सव समिती वेगळी करतो यंदाच्या वर्षी दरवर्षी प्रमाणे भगवान परशुराम जन्मोत्सव २९ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला समाजातील तरुण मुले व महीला मिळुन २५० जणांचे लेझिम पथक होते तर द्वारकाधिश मंदीराच्या

वतीने ५० महीलांचे भजनी मंडळ होते. ही मिरवणूक दत्त चौक नवी पेठ मार्गावरून मॅकानिकी चौक मार्गे हुतात्मा चौकात ६.४५ ला पोहोचली त्या ठिकाणी ५० ब्रह्मवृंदांनी जन्मोत्सव साजरा केला. शहरातील तिन्ही आमदारांसह सर्व राजकीय नेत्यांनी हजेरी लावली समाजातील डॉक्टर वकील नाट्य क्षेत्रातील गायन वादन क्षेत्रातील साहीत्य क्षेत्रातील मंडळी मिरवणुकी सह कार्यक्रमास हजर होती साधारण रात्रौ १० वाजे पर्यंत दर्शन व प्रसादासाठी ४००० हजारावर अधिक लोक या परशुराम स्नेह मेळयास हजेरी लावणारी ठरली.

* **पुणे :** व्यवहार ते परमार्थापर्यंतचे प्रबोधन करणारी समर्थ रामदास स्वामी यांची ग्रंथसंपदा अभ्यासावी, अनुभवावी आणि अंगिकारावी, असे प्रतिपादन डॉ.सौ.अपर्णा बेडेकर यांनी केले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने डॉ.अपर्णा बेडेकर यांना दासबोधावरील संशोधनाबद्दल काशी केशव पुरस्कार, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दोन हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या प्रसंगी व्यासपीठावर कार्याध्यक्ष जयंत देशपांडे, विश्वस्त सुलभा शिरगावकर, सुनिता तावरे हे मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ.बेडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राष्ट्राचा सर्वांगीण प्रपंच चालवण्यासाठीच रामदास स्वामी अवतरले, असे मत त्यांनी मांडले. संत तुकाराम महाराज बीज ते एकनाथ षष्ठी या दरम्यान देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे प्रतिवर्षी सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात येतो. महोत्सवाच्या प्रारंभी संस्थेचा मानाचा काशी-केशव पुरस्कार आणि अन्य पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. त्यानुसार यंदा वेदमूर्ती महाबळेश्वर गुरुजी पुरस्कार वेदमूर्ती मधुकर सदाशिव जांभेकर गुरुजी यांना प्रदान करण्यात आला, पौरोहित्य दांपत्य पुरस्कार सौ.व श्री.अमृत अविनाश गाडगीळ, किर्तनकार पुरस्कार अनुश्री ओंकार ब्रम्हे, आदर्श शिक्षक पुरस्कार कल्याणी श्रीकृष्ण नामजोशी, आदर्श पिता पुरस्कार जयंत मिरवणकर, कवयित्री पुरस्कार ऋचा अविनाश थत्ते, पांडित्य पुरस्कार श्रीपाद ब्रह्मे, बहुविकलांग-अपंग सेवा पुरस्कार सुचिता प्रदिप फासे, आदर्श माता पुरस्कार विद्या राजेंद्र कुलकर्णी, उत्कृष्ट महिला कार्यकर्त्या पुरस्कार उषा सुरेश देखणे यांना प्रदान करण्यात आला आणि आदिती बुरसे व स्वप्ना देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मुख्य चिटणीस सुनील पारखी यांनी केले, सांस्कृतिक समिती प्रमुख अनिल पानसे यांनी सर्वांचे आभार मानले.

* **नाशिक** : १ मे २०२५ देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्यावतीने यंदाही सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ऋग्वेद सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात यंदा १४ बटूवर व्रतबंधनाचा संस्कार करून गायत्री मंत्राची दीक्षा देण्यात आली. या सोहळ्यात सामुहिक देव प्रतिष्ठा चौल, मातृभोजन, भिक्षावळ व स्वरुची भोजन या कार्यक्रमाचा समावेश होता. दोन बटूचा व्रतबंध संस्थेतर्फे मोफत करण्यात आला. सकाळी ६.३० वाजता सोहळ्याला प्रारंभ झाला. अकराच्या मुहूर्तावर टाळ्यांच्या गजरात, सुमधुर मंगलाष्टकांच्या स्वरात, समाज बांधवांच्या उपस्थितीत हा देखणा कार्यक्रम पार पडला. व्रतबंध सोहळ्यासाठी सिंधुदुर्ग, नाशिक, कल्याण, नगर या भागातून बटूनी सहभाग नोंदवला. सोहळा यशस्वीतेसाठी व्रतबंध सोहळ्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, श्री. निषाद दशपुत्रे, श्री. किशोर हिंगणे, श्री. राजेंद्र हातवळणे श्री. प्रशांत निरंतर, श्री. संदीप गोसावी, श्रीमती सविता कुलकर्णी (सातपूरकर), कर्मचारी श्री. दत्तात्रय देवळालकर, श्री. मनोज मोहरीर, सौ. दीप्ती हिंगणे यांनी परिश्रम घेतले. यावेळी वेदमूर्ती मनिष पैठणकर, श्री. विपुल कुलकर्णी, श्री. सारंग मेहंदळे, श्री. वैभव दाणी या व्रतबंध सोहळ्याचे पौरोहित्य केले. व्रतबंध सोहळ्यास सढळ हाताने देणगी देणाऱ्या देणगीदार श्री. चंद्रकांत गणेश कुलकर्णी, श्री. मुकुंद कोकीळ, श्री. प्रदीप कुलकर्णी, श्री. सतीश पेटकर, श्री. माधुरी कोन्डो, श्रीमती सुचेता देवरे, यांचे संस्थेतर्फे आभार मानण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, कार्यवाह श्री. मकरंद सुखात्मे, खजिनदार श्री, विनायक एडगावकर, विश्वस्त

श्री. मोहिनीराज कुलकर्णी, श्री. वसंत कुलकर्णी (आहेरगावकर), युवकशाखा कार्यवाह श्री. संदीप गोसावी, कार्यकारणी सदस्य श्री. निषाद दशपुत्रे, श्री. किशोर हिंगणे, श्री. विशाल शिंगवेकर, श्री. राजेंद्र हातवळणे श्री. प्रशांत निरंतर, श्री. सचिन निरंतर श्री. अजय चौधरी, श्री. अशोक कुलकर्णी महिला शाखा कार्याध्यक्षा श्रीमती सविता कुलकर्णी(सातपूरकर) कार्यवाह सौ. सुजाता करजगिकर, महिलाशाखा सदस्य सौ. माधवी तगारे, श्रीमती सुचेता देवरे, श्रीमती अमिता कुलकर्णी, सौ. विजया म्हैसपुरकर, सौ. रश्मी हातवळणे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे........................................................................................................**

*** आयुष भालचंद्र कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २१/०९/१९९६, **जन्म वेळ :** रात्री १०.१४, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.७, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वाषाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** मास्टर इन फार्मसी, **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:चा व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** ३५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी, **संपर्क :** ९२२३५७०८५१/९२२१२१२४०६

*** आदित्य अनुजा अनुराज सराफ (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/११/२०००, **जन्म वेळ :** सकाळी १०.१३, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कुंभ, **नक्षत्र :** पूर्व भाद्रपदा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** डिप्लोमा इन मैकेनिकल इंजीनियरिंग, बी. इ. इन मैकेनिकल इंजीनियरिंग, एम. इ. (मशीन डिझाइन) पर्सुइंग, **नोकरी/ व्यवसाय :** एच ओ डी (मैकेनिकल डिपार्टमेंट) इन इंजीनियरिंग कॉलेज, **वार्षिक उत्पन्न :** ३.५लाख, **अपेक्षा :** मनमिळावू, सुस्वभावी, नोकरी(ऐच्छिक), शुध्द शाकाहारी, शिकलेली असावी, **संपर्क :** ९२२६५२२७७३

*** चिन्मय घनश्याम आमटे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ३१/१२/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ११.५७, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.९, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पुर्वा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B. Com. CFA level 2, **नोकरी/ व्यवसाय :** MNC (Sr. Consultant), **वार्षिक उत्पन्न :** २९लाख, **अपेक्षा :** साधी, कुटुंबाभिमुख, कोणत्याही शाखेतून पदवीधर, **संपर्क:** ९५९४०४२५००/९८६७९२८४५२/८४२४८८४४१४

*** शंतनू लक्ष्मीकांत कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/१२/१९९०, **जन्म वेळ :** सकाळी ६.४०, **जन्म ठिकाण :** परभणी, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (–), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा (शांती केली आहे), **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B. E.(Mech), M. Tec.(Mecatronics), **नोकरी/ व्यवसाय :** Senior Engineer Gr.1 – ME Flash Electronics(I) Private Limited Chakan Pune **वार्षिक उत्पन्न :** ६लाख ५०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७२७६७१९०१९/९९६७७११२०९

*** केदार सुनील मंडावले (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०२/०८/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.३०, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** काश्यप, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** M.Com., JAIIB, CAIIB, **नोकरी/ व्यवसाय :** Manager ICICI Bank Pune, **वार्षिक उत्पन्न :** ११.७०लाख, **अपेक्षा :** अनुरूप, मनमिळाऊ, पदवीधर/ व्दिपदवीधर, नोकरी करणारी, **संपर्क :** ९१४५४७५९५७/८१४९३४४०८४

* **भूषण सुधाकर जोशी (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०३/१९८०, **जन्म वेळ :** दुपारी १.५६, **जन्म ठिकाण :** गिरगाव (मुंबई), **उंची :** ५.३, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कृष्णात्रय, **रास :** धनु, **नक्षत्र :** उत्तराषाढा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B. Com, PGDBA (Finance), **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, फेरानी हॉटेल्स प्रा. लि. (के. रहेजा कन्स्ट्रक्शनची सिस्टर कन्सर्न), **वार्षिक उत्पन्न :** ७ लाखाच्यावर, **अपेक्षा:** (Specify City Also), नोकरी, शिक्षणाची अट नाही, सुसंस्कारी, अनुरूप, **संपर्क :** ९८१९११९६४७/ ९२२४०२१२५६

* **दुष्यंत सुधाकर जोशी (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०२/१०/१९८१, **जन्म वेळ :** सकाळी ११.५३, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कृष्णात्रय, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. ए. (मुंबई विद्यापीठ), **नोकरी/ व्यवसाय :** टूर्सचा स्वत:चा व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** ३लाखाच्यावर, **अपेक्षा :** (Specify City Also), नोकरी, शिक्षणाची अट नाही, सुसंस्कारी, अनुरूप, शहर कोणतेही चालेल, **संपर्क :** ९८२०१७७०२५/९२२४०२१२५६/९२२१०६३२३१

* **संकेत सुनील जोशी (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०५/१९८९, **जन्म वेळ :** दुपारी २.२०, **जन्म ठिकाण :** किर्लोस्करवाडी, **उंची :** ५.१, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** तुळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी:** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम. बी. ए, **नोकरी/ व्यवसाय :** नाहूर (मुंबई), **वार्षिक उत्पन्न :** १४लाख, **अपेक्षा:** अनुरूप, पदवीधर, नोकरी करणारी किंवा घरगुती व्यवसायात हातभार लावणारी, डोंबिवली मध्ये राहण्याची तयारी असावी, **संपर्क :** ९९३०१४६५८७/९९३०७०३८७७

* **हृषिकेश अनील मोडक (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ३१/०८/१९९७, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.०२, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.११, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** कर्क, **नक्षत्र :** अश्लेशा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम.एम. बी. ए फायनान्स, अप्पीअर्ड फॉर (सी एफ ए), **नोकरी/ व्यवसाय :** Own office, Research Analyst, Equity Currency Market, GST, Taxation, Insurance, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख आणि त्याहून अधिक, **अपेक्षा :** अनुरूप, शिक्षित, **संपर्क :** ९८३३१३१८७१/९८३३१३१३४०

**वर पाहिजे ......................................................................................**

* **पल्लवी संजय वळसंगकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २९/०४/१९८८, **जन्म वेळ :** सकाळी २.२५, **जन्म ठिकाण :** चेबूंर (मुंबई), **उंची :** ५, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** मुद्गल, **रास :** कन्या, **नक्षत्र:** उत्तरा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** M.Sc in Business Analytics (UK), BE in instrumentation, **नोकरी/ व्यवसाय :** सध्या पार्ट टाईम जॉब यूके मधे करत आहे, **अपेक्षा :** अनुरूप, उच्चशिक्षित, **संपर्क :** ९८६७५०३३६८

* **सोनिया संजय जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०४/१९८९, **जन्म वेळ :** दुपारी ४.१०, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ४.११, कॉन्टॅक्ट लेन्स आहे, **गोत्र :** काश्यप, **रास :** कन्या, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** निम्म सरकारी, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** कायम नोकरी असावी, **संपर्क :** ९७५७१५४४४६

* **अपूर्वा मोहन बहिरट (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०७/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी

११.३५, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** बादरायण, **रास :** मीन, **नक्षत्र :** रेवती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, पी जी डी एम - फायनान्स करत आहे, **नोकरी/ व्यवसाय:** ठाणे, **वार्षिक उत्पन्न :** ७ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, चांगली नोकरी, निर्व्यसनी, मुंबई पुणे प्राधान्य, **संपर्क:** ९८७०७१४७३०/९०२९९१२१४५/९८७०७५७००४

*** रूचा गोपीनाथ गुडी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/१२/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी १२.५५, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** मौन भार्गवा, **रास :** तुळा, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, एम बी ए ग्रेजुएट इन फायनान्स (मुंबई युनिव्हर्सिटी), **नोकरी/ व्यवसाय :** बँक (प्रभादेवी), **वार्षिक उत्पन्न :** ६लाख ६०हजार, **अपेक्षा :** व्यावसायिकदृष्टया पात्र, **संपर्क :** ९८३३५०६३६३

*** संजना शैलेश जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/०४/१९९९, **जन्म वेळ :** दुपारी ३.१०, **जन्म ठिकाण :** सांगली, **उंची :** ५.१, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तर भद्रापाडा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम. एससी, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (गोरेगाव), **वार्षिक उत्पन्न :** ४लाख ५०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९३०७५७२३१

*** हर्षदा संजीव पांगारकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/१२/१९९८, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.५०, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.२, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** हरितस्य, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** कंम्प्यूटर इंजिनियर, एनिमेटर, **नोकरी/ व्यवसाय :** Freelance Graphic Designer, **वार्षिक उत्पन्न :** ४ ते ५लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, स्वत:चे घर, निर्व्यसनी, नाशिकचा मुलगा नको(जॉबच्या दृष्टीने), **संपर्क :** ९७६५५५८७२६

*** प्राजक्ता आनंद भडासगावकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०१/१९९४, **जन्म वेळ :** पहाटे ३.१०, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.९, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** गार्गय, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तर भाद्रपदा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॅाम, **नोकरी/ व्यवसाय :** Event management PG, **वार्षिक उत्पन्न :** ३लाख, **अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी, पदवीधर, **संपर्क :** ९०२८४७९४६४

*** प्राजक्ता दत्तात्रय आफळे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०५/१९८३, **जन्म वेळ :** रात्री ११.३१, **जन्म ठिकाण :** अंधेरी, **उंची :** ५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** श्रेष्ठा (शांती केली आहे), **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॅाम, **नोकरी/ व्यवसाय : -, वार्षिक उत्पन्न : -, अपेक्षा :** नोकरदार, निर्व्यसनी, घर स्वत:चे, **संपर्क :** ९८३३८७७५४/९७६९२२८६०६

*** संजीवनी अनिरूध्द पाठक (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०५/१९९७, **जन्म वेळ :** पहाटे ३.५५, **जन्म ठिकाण :** दादर, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गार्ग्य, **रास :** मेष, **नक्षत्र :** अश्विनी, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** 1) Persuing Ph. D in ICT Matunga Mum.(Last year), 2)M. Tech in Pharmacetical Biotechnology, **नोकरी/ व्यवसाय :** Pursuing Ph. D. in Immuno – Oncoogy in ICT Matunga Mum. (Last year), **वार्षिक उत्पन्न :** Rs. 52000/- as monthly fellowship, **अपेक्षा:** पोस्ट ग्रॅच्युएट, निर्व्यसनी, Vegetarian / Eggetarian मुंबई किंवा उपनगरातील स्थळ हवे आहे, **संपर्क :** ८०८७३०३४०७

## (घटस्फोटित / पुर्नविवाह)

### वर पाहिजे ..........................................................................................

※ **संगीता सुरेश जोशी (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०१/०६/१९७१, **जन्म वेळ :** दुपारी ३.३५, **जन्म ठिकाण :** नागपूर, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम. ए., **नोकरी/ व्यवसाय :** B.M.C (Mumbai), **वार्षिक उत्पन्न :** १२लाख, **अपेक्षा:** ठाणे येथे स्थायिक, वय ५० ते ६०, उंची ५-८च्यावर, इनकम २०लाखाच्यावर, **संपर्क :** ७७३८४३२५०९

### वधू पाहिजे ..........................................................................................

※ **प्रीतम मदन हसबनीस (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/१०/१९८८, **जन्म वेळ :** सकाळी ९.२५, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.११, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** कौंडिण्य, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** HSC. Com., **नोकरी/ व्यवसाय :** H. D. Cotp. Mumbai, **वार्षिक उत्पन्न :** ३लाख ७०हजार, **अपेक्षा :** वयात १ते ५वर्ष, कमीतकमी १२वी, **संपर्क :** ९३२२८०३९२६/ ७३९७९४४०२६

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**

---

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या शैक्षणिक, आरोग्य व इतर अनेक सामाजिक उपक्रमासाठी देणगी देऊन संस्थेबद्दल आपुलकी व्यक्त केली आहे.

| | |
|---|---|
| **१. श्री. शिरीष दिनकर देशपांडे** | **₹ ३,००,०००/-** |
| **२. श्री. जनार्दन विठ्ठल कढे** | **₹ १,००,०००/-** |
| **३. श्री. दिपक कुर्डुकर** | **₹ १,००,०००/-** |
| **४. श्री. उमेश क्षिरसागर** | **₹ १,५००/-** |
| **५. श्री. पंकज डुबेरकर** | **₹ ३,००१/-** |

या सर्व मान्यवर सभासदांचे मध्यवर्ती मंडळ आभार व्यक्त करीत आहे.

---


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध.**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# अभिप्राय

मा. अध्यक्ष साहेब,
अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,
मुंबई

मा. महोदय,

आपण मला दि. १५ मार्च २०२५ रोजीच्या मंडळाच्या सभेत निमंत्रीत केल्याबद्दल मी आपला व सर्व कार्यकारणी सदस्यांचा आभारी आहे.

मध्यवर्ती मंडळाचा कारभार अतिशय सुंदर व पारदर्शी असल्याचे अनुभवास आले. इतक्या मोठ्या प्रमाणांत संस्थेचा कारभार चालवतांना सर्व विषय खेळीमळीने मंजूर करणे हे भूषणावह आहे. मला व्यक्तिशः सभेत उपस्थित राहून माझे विचार मांडता आले. या बद्दल मी आपला ऋणी आहे.

माझी वैयक्तिक आपण आपुलकीने चौकशी केली याचा मला सार्थ अभिमान आहे. परीचय नसतांनाही कार्याध्यक्ष श्री. प्रभाकरपंत कुलकर्णी व कार्यवाह श्री. मिलिंदजी सरदेशमुख साहेब यांनी मला वैयक्तिक आग्रहाने निमंत्रित केले होते. तसे पाहिले तर मी गेल्या १७-१८ वर्षात माझ्या वैयक्तिक कारणांमुळे मध्यवर्ती मंडळाच्या संपर्कात नव्हतो. तसा मी काही फार मोठा कार्यकर्ता नाही. मागील सन १९८२ - ८३ सालापासून धुळे येथील ऋग्वेदी संस्थेत काम करीत आहे. माझ्या कामाचा आढावा म्हणून मध्यवर्ती मंडळाने सन २००६ साली 'उत्कृष्ट कार्यकर्ता' म्हणून गौरव केला होता.

मध्यवर्ती मंडळाचा अतिशय पारदर्शक व उत्कृष्ठ चाललेले कार्य व आपल्या समाजाप्रती असलेली कर्तव्यभावना व उदात्त भावनेने चाललेले कार्य फारच कौतुकास्पद आहे.

सर्वच पदाधिकारी आपला बहुमुल्यवेळ आपल्या संस्थेच्या कार्याला देतात हे फारच कौतुकाचे व अभिनंदनीय आहे.

मला संस्थेच्या सभेत भाग घेण्यास मिळाला हा मी माझा बहुमान समजतो. संस्था माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यालाही कार्य करण्याची संधी देते ही मोलाची बाब आहे. मला विशेषत: अभिमानास्पद वाटले ते असे की मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. भैयासाहेब गंधे, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकरपंत कुलकर्णी व कार्यवाह श्री. मिलिंदजी सरदेशमुख यांनी माझी वैयक्तिक केलेली विचारपूस. ह्यामुळे मी खूपच भारावून गेलो आहे. यासाठी मी त्यांचा सर्वस्वी ऋणी आहे.

तसेच सभेला बाहेरून आलेल्या संलग्न संस्थांच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी भेट झाली. तसेच प्रत्येकाने आपापल्या संस्थेत चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. सर्व संलग्न संस्थांचे पदाधिकारी वैयक्तीक संपर्कात राहून सर्व ज्ञाती बांधवासाठी अडचणींच्या वेळी मदत करावी हे समाजहीतासाठी उपयुक्त राहील व आपला सर्व समाज संघटीत होईल असे मला वाटते.

पुनश्च: आपण मला बोलावून माझा सत्कार केला त्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

धन्यवाद.

आपला
**श्री. विलास विनायक क्षिरे**
(कार्याध्यक्ष)
देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, धुळे.


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

गुढी उभारुन आकाशी, बांधून तोरण दाराशी, काढून रांगोळी अंगणी,
हर्ष पेरुणी मनोमनी, करु सुरुवात नव वर्षाची...

गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum.
**Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161
**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357
**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. Ph.: 2431257
**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655

**AKSHAY DEPOSIT SCHEME**

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

**NIRANTAR**

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply

ॲड. अजय ए. सुनाळकर - चेअरमन    अभय व्ही. जोशी - व्हा. चेअरमन

....... संचालक मंडळ .......

गणपत ए. कुलकर्णी • विनायक जी. जोशी • प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी • मालतेश जी. पाटील • सुनंदा सी. आळतेकर • छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी • उमेश सुणगार • परशुराम एम. कांबळे • अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर - सेक्रेटरी • गौरी एस. बिडी - जन. मॅनेजर

सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

# अभिनंदन

## माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींचे अभिनंदन आणि विशेष कौतुक

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH